संक्षिप्त

डॉ. भाऊजी दप्तरी जयंती सोहळा उद्या

नागपूर : कै. भाऊजी दप्तरी स्मारक ट्रस्ट, नागपूर यांच्यातर्फे कै. भाऊजी दप्तरी यांच्या जयंतीनिमित्त रविवार, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संजय तांबे (एम.डी. होमिओपॅथी) उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी डॉ. राजेंद्र डोळके (ट्रष्टाध्यक्ष, दप्तरी ट्रस्ट) राहतील. हा कार्यक्रम राष्ट्रभाषा समितीचे बाबुराव धनवटे सभागृह, वोक्हार्ट हॉस्पिटलच्या मागे, शंकरनगर, नागपूर येथे होणार आहे. यावेळी पुरस्कार वितरणासह होमिओपॅथिक डॉक्टरांचा सत्कार करण्यात येणार आहे. सत्कारमूर्ती म्हणून डॉ. मीना सुंभ, डॉ. कुलसुम रेशीमवाला, डॉ. सुरेखा वानखेडे, डॉ. निवती मिरगाणी आणि डॉ. अजय काळे यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

विजय ठाकरे विदर्भभ्यक्षपदी

वरिष्ठ नागरिक परिसंघाच्या विदर्भ प्रदेशाध्यक्षपदी विजय ठाकरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कॉग्रेसनगर, धंतोली येथील भारतीय मजदूर संघाच्या सभागृहात झालेल्या विशेष कार्यसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. माजी अध्यक्ष रवी गाडे यांच्या निधनामुळे हे पद रिक्त होते परिसंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस चंद्रकांत देशपांडे यांनी विजय ठाकरे यांच्या निवडीची घोषणा केली. बैठकीला भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा नीता चौबे, परिसंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विवेक देशपांडे, विदर्भ प्रदेश सरचिटणीस सुधीर डबरे उपस्थित होते. या निवडीबद्दल भारतीय मजदूर संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक वसंत पिंपळापुरे, गजानन गटलेवार, हर्षल टोंबरे, जयंत आसोले, सुरेश एस. चौधरी, प्रकाश वणीकर, नितीन बोरवणकर यांच्यासह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी विजय ठाकरे यांचे अभिनंदन केले.

मृत कामगाराच्या कुटुंबाला नुकसानभरपाई

भांडेवाडी येथील कचरा प्रक्रिया व जैवखनन प्रकल्पात काम करताना अपघाती मृत्यू झालेल्या सलमान शेख यांच्या कुटुंबीयांना कंपनी व्यवस्थापनाकडून २० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली. शिवसेनेचे नागपूर जिल्हाप्रमुख नितीन तिवारी यांच्या पुढाकारानंतर आणि महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांच्या मध्यस्थीने हा तोडगा काढण्यात आला. विशेष म्हणजे, घटनेनंतर अवघ्या सात दिवसांत नुकसानभरपाई मिळवून देण्यात आल्याचा दावा शिवसेनेने केला आहे.

'पलाश' आंतरशालेय स्पर्धा २५ नोव्हेंबरपासून

सोमलवार शिक्षण संस्थेच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या 'पलाश' या आंतरशालेय स्पर्धेचे यंदा दहावे वर्ष असून, २५ ते २८ नोव्हेंबरदरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. रामदासपेठ येथील सोमलवार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या परिसरात या स्पर्धा पार पडणार आहेत. नागपुरातील ३० नामांकित शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ २५ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता होणार आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (डाएट) प्राचार्या हर्षलता बुरडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला आमदार अभिजित वंजारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. स्पर्धेचा समारोप आणि बक्षीस वितरण समारंभ २८ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० वाजता होणार आहे. जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल दहिफळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. यावेळी संपादक शैलेश पांडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विविध स्पर्धांमधील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे, तर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात येणार असल्याची माहिती, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली डाखोळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

चार चौकशी समित्यांचे अहवाल रखडले

■ एनएसयूआयचा विद्यापीठ प्रशासनावर आरोप

■ सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनवसुलीची तक्रार अंशतः सत्य

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विविध प्रकरणांच्या चौकशीसाठी कुलगुरूंनी स्थापन केलेल्या चार प्रमुख समित्यांपैकी एकाही समितीचा अहवाल अद्याप जाहीर झालेला नाही. विशेष म्हणजे, सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा आठ हजार रुपये वसूल केल्याच्या तक्रारीत अंशतः सत्य असल्याचे समितीने मान्य केले आहे. मात्र, त्यानंतरही संबंधितांवर कारवाई झालेली नाही. विद्यापीठातील अधिकारी कुलगुरूंच्या निर्देशांना गांभीर्याने घेत नाही, अशी टीका एनएसयूआयच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

विद्यापीठाच्या जमनालाल बजाज भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत एनएसयूआयच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निविदा न काढता करण्यात आलेल्या कामांची तसेच अतिरिक्त कामांची चौकशी करण्यासाठी स्थापन समितीने अद्याप कामाला सुरुवातही केलेली नाही. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे अपेक्षित होते, दुसरीकडे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात सवलत आणि आवश्यक आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी स्थापन केलेल्या विद्यार्थी सहायता टास्क फोर्सचे कामही सुरू झाले नाही. चौकशी समित्या स्थापन करून प्रश्न मार्गी लावण्याऐवजी केवळ औपचारिकता पूर्ण केली जात आहे. त्यामुळे कुलगुरूंनी दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी नेमकी कोणत्या स्तरावर रखडली, असा प्रश्नही एनएसयूआयने उपस्थित केला.

या बैठकीला एनएसयूआयचे अजित सिंह, राष्ट्रीय सचिव वैष्णवी भारद्वाज, आशीष मंडपे, प्रदेश महासचिव प्रणय सिंह ठाकूर आदी उपस्थित होते.

सफाई कंपन्यांचे करार रद्द करण्याची शिफारस

एनएसयूआयच्या मागणीनंतर पदीक्षा कामकाजातील कथित अनियमिततेप्रकरणी 'कोएम्प एज्युटेक प्रायव्हेट लिमिटेड'च्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. मात्र, या समितीचा अहवाल अद्याप समोर आलेला नाही. विद्यापीठातील सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा आठ हजार रुपये वसूल केल्याच्या तक्रारीच्या चौकशीत कर्मचारी आणि निरीक्षकांमध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचे समितीने मान्य केले आहे. दोन्ही सफाई कंत्राटदार कंपन्यांचे करार रद्द करण्याची शिफारससही करारातील अटींच्या आधारे करण्यात आली. मात्र, कथित पुढील कारवाई झालेली नाही. संबंधित कंपन्यांना अप्रत्यक्षपणे पाठीशी घातले जात असल्याचा आरोप एनएसयूआयने केला.

नागपुरात उद्या डिझाईन प्रदर्शन

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : भंवर राठोड डिझाइन स्टुडिओच्या (बीआरडीएस) वतीने २२ नोव्हेंबरला नागपुरातील नक्षत्र बँक्वेट येथे डिझाईन प्रदर्शन २०२६ आयोजित करण्यात आले आहे. यात डिझाईन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कलात्मक कलाकृती, त्रिमितीय प्रतिकृती, वस्त्रनिर्मितीचे नमुने, चित्रे आणि विविध सर्जनशील प्रकल्प मांडण्यात येणार आहेत. बीआरडीएसचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. भंवर राठोड हे विद्यार्थ्यांना डिझाईन क्षेत्रातील करिअरच्या संधी तसेच एनआयडी, एनआयएफटी, नाटा आणि यूसीईईडी या प्रवेश परीक्षांच्या तयारीबाबत माहिती देतील. देशभरातील २५ हून अधिक नामांकित महाविद्यालये आणि विद्यापीठांचे प्रतिनिधीही सहभागी होणार आहेत. दिल्ली, मुंबई, अहमदाबाद, बेंगळूरू, नाशिक, हैदराबाद, पुणे, जयपूर, छत्रपती संभाजीनगर, लखनऊ, कोलकाता, भोपाळ, अकोला, यवतूर आणि नागपूर अशा १५ शहरांमध्ये हे प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. २००५ मध्ये स्थापन झालेल्या बीआरडीएसची देशभरात ९० हून अधिक केंद्रे आहेत. संस्था दरवर्षी १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना डिझाइन, वास्तुकला आणि ललित कला क्षेत्रात मार्गदर्शन करते.

अधिवेशन येताच अनधिकृत फलकांवर नजर

महापालिकेकडून राजकीय पक्ष, सामाजिक संस्थांवर कारवाईचा बडगा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : येत्या ७ डिसेंबरपासून शहरात राज्याच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रमुख रस्त्यांवर प्रवेशद्वार, नेत्यांच्या स्वागताचे फलक, जाहिरात फलकाची शक्यता बघता महापालिकेने कारवाईसाठी पाऊल उचलले. अनधिकृत जाहिरात फलक, स्वागतद्वार, तोरणे आणि पताका लावणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे.

अधिवेशन काळात सिव्हिल लाईन, विधानभवन परिसर, वर्धा मार्ग, धरमपेठसह शहराच्या विविध भागात फलक लावले जाते. वासाठी महापालिकेची परवानगी घेतली जात नाही. महापालिकेने यंदा अधिवेशनापूर्वीच कारवाईसाठी पुढाकार घेतला आहे. अनधिकृत जाहिरातींबाबत महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी असे आवाहन अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम यांनी केले आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाने कायदेशीर कारवाई

महापालिका क्षेत्रात सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, स्वागतासाठी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी परवानगीशिवाय प्रवेशद्वार, तोरणे अथवा जाहिरात फलक उभारणे अथवा लावणे हे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आहे. फलकांवर नाव असलेले व्यक्ती, संस्था, राजकीय पक्षाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील अवमान याचिकेवरील आदेशांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे अतिरिक्त आयुक्त मेश्राम यांनी नमूद केले.

येथे जाहिरात फलक लावण्यास मनाई

रस्ते, पदपथ, विद्युत खांब, वाहतूक सिग्नल, ट्रॅफिक आयलँड, मेट्रोचे पिलर्स तसेच अन्य सार्वजनिक ठिकाणी परवानगीशिवाय जाहिरात फलक, स्वागतद्वार अथवा पताका लावता येणार नाही, असे महापालिकेने स्पष्ट केले.

अनधिकृत फलकाबाबत तक्रार करण्याचे आवाहन

शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध आहे.



स्त्रियांनी व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवावे -डॉ. प्रभा गणोरकर

जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

नागपूर : स्त्री साहित्याचा विचार करताना स्त्रियांनी व्यक्तिगत अनुभवांच्या पलीकडे जाऊन व्यापक सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि वैचारिक वास्तवाचा शोध घ्यायला हवा. तसेच प्रस्थापित व्यवस्थांना प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि संमेलनाध्यक्ष डॉ. प्रभा गणोरकर यांनी केले.

दोन दिवसीय नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे शुक्रवारी संमेलनाध्यक्ष डॉ. प्रभा गणोरकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी त्या बोलत होत्या. स्वागताध्यक्ष व स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य श्रीपाद अपराजित, डॉ. प्रमोद मुनघाटे आणि महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रीता सोनटक्के यांची मंचावर उपस्थित होती. मराठी स्त्री लेखनाची परंपरा अत्यंत समृद्ध असल्याचे सांगत गणोरकर म्हणाल्या, स्त्री साहित्याने आता ज्ञान-विज्ञान, कायदा, आंतरराष्ट्रीय संबंध, सार्वजनिक धोरण, राजकारण आणि अर्थकारण यांसारख्या विषयांकडेही वळण्याची आवश्यकता आहे. स्त्री साहित्याने समाजव्यवस्थेचे विश्लेषण करावे, प्रस्थापित विचारांना प्रश्न विचारावेत आणि नव्या सामाजिक व वैचारिक शक्यतांचा मार्ग दाखवावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी साहित्य संमेलनांच्या आयोजनामागील शासनाच्या भूमिकेवर भाष्य केले. शासनाकडून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला अनुदान दिले जाते होते. मात्र, मागील वर्षापासून प्रत्येक जिल्ह्यात एक साहित्य संमेलन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. साहित्य संमेलनांचे विकेंद्रीकरण करण्याचा हेतूने हा निर्णय महत्त्वाचा आहे. त्या अनुषंगाने हे संमेलन महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. प्रास्ताविक स्वागताध्यक्ष रवींद्र फडणवीस यांनी केले. संचालन डॉ. प्रवीणा नागपूरकर यांनी तर डॉ. चंद्रशेखर गीते यांनी आभार मानले.

स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत 'सीएजीएफ'ची दिवाळी



नागपूर : सिक्किम ॲक्सन ग्रुप फाउंडेशनतर्फे (सीएजीएफ) दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक बांधिलकी जपत धरमपेठ परिसरात कार्यरत महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी आणि घरोघरी जाऊन कचरा संकलन करणाऱ्या स्वच्छता दूतांसाठी दिवाळी स्नेहभोजन आणि दिवाळी मिलन' कार्यक्रम शुक्रवारी पार पडला. धरमपेठेतील सुगंध मंगल कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम उपस्थित होते. त्यांच्या हस्ते व 'सीएजीएफ'च्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वच्छता दूतांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याला परिसरातील नागरिकांनीही उपस्थिती राहून स्वच्छता दूतांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी 'सीएजीएफ' परिवाराने परिश्रम घेतले.

अरुण धाबू यांचे निधन



संती रोड, इतवारी येथील रहिवासी अरुण केशवराव धाबू (७६) यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गंगाबाई घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी, सून असा आप्तपरिवार आहे.

संजय भिलकर यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी



नागपूर : प्लॉट न ६२ सद्भावना नगर, झिंगाबाई टाकळी येथील रहिवासी संजय बाबाराव भिलकर (५५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी सकाळी १० वाजता निघेल आणि मानकापूर स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली व आई, वडील असा आप्तपरिवार आहे.

लोकसत्ता क्लासिफाइड्स
सम्यकारिता सर्वसेवा

जागासंबंधी	जाहिरात छोटी, प्रतिसाद मोठा संपर्क-२८०६९०४, २८०६९०३
जागाविषयक	
OUT OF MUMBAI	

कोतवडे रत्नागिरीपासून १४ किमी, गणपतीपुळेपासून ७ किमी अंतरावर निसर्गरम्य महालक्ष्मी मंदिर, साईबाबा मंदिर वातावरणात रहाण्यासाठी योग्य ४ मजली इमारत लिफ्टसहित 1RK, 1BHK सर्व सोयींयुक्त नवीन १६ फ्लॅटस विक्रणे आहे. सिनिअर सिटीझन, कोकणवासी, वृद्धाश्रम, सेकंड होमकरिता योग्य. संपर्क- 9322892326/ 9137959323.
0071072611-1

महत्त्वपूर्ण निवेदन
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडजर्टाईजिंग कॉपी) स्थानिकरणापुर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या अशास्त्रीयं (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रामध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचे जाहिरातदार केपत्या, सहयोगी संस्था अथवा त्यासंबंधीच्या व्यवहार केल्यापूर्वी कोणत्याही स्वरूपाचीच व्यवहार या सर्वे झाल्याबा त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील अवास्तवाशी द इंडियन एक्सप्रेस (प्रा.) लिमिटेड/या त्यायोगदार उत्तरित येणार नाही. त्यामुळे वाचकांनं आपली अशा स्वरूपा देणे की, जाहिरातदारांच्या कोणतीही स्वरूपा प्रेरित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याशीच कोणत्याही स्वरूपाचे संबंधित कार्यविरुद्ध करण्यापूर्वी अथवा पडताळा जाहिरातींच्या आधारित कोणतीही कृतीही करण्यापूर्वी त्यांचे आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

EMPLOYMENT NOTICE
Application are invited for the the following Vacant posts in **Dada Ramchand Bakhru Sindhu Mahavidyalaya**, Panchpoli, Nagpur - 440017 college Run by **Sindhi Hindi Vidya Samiti**

SUBJECTS	NO OF POST (s)	NATURE OF POST (s)	NATURE OF VACANCY	CATEGORY	Number of Advertisement
Artificial Intelligence - (UG)	Assistant Professor-1	Full Time	Clear Non Granted	Open-1	First Time

The last date for submission of application is **07-12-2026**
Details in respect of pay scale, qualification, experience etc. are available on the University web portal **nagpuruniversity.ac.in/** & the College website **https://drbsmmvnagpur.ac.in/.**
(NOTE: Candidates are required to submit two passport size colour photographs alongwith application)
President/General Secretary/Principal
Dada Ramchand Bakhru Sindhu Mahavidyalaya
Panchpoli, Nagpur - 440017
Date : 18-11-2026

SBI भारतीय स्टेट बँक
शाखा - गृह ऋण केंद्र - I, नागपूर
प्रथम तळ, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग, नागपूर - 440001

पॉसिशि IV [नियम 8 (1)]
सांकेतिक ताबा सूचना
(अचल संपत्ती करीता फक)

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनॅन्शियल ॲसेटस ॲन्ड इंफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट 2002 (दुसरा) च्या अंतर्गत खालील दस्ताक्षरकर्ता हे भारतीय स्टेट बँक, एपालनी - I, नागपूर, चे अधिकृत अधिकारी आहे तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (इंफोर्समेंट) रुल्स 2002 चे सेक्शन 13 (12) च्या सोबतच वाचले जाणारे रुल 9 च्या अंतर्गत **कार्जदार सुश्री. आयुषी नसादेव तागडे** यांना **डिमांड नोटिस दिनांक 01/09/2026** ला देऊन सुचवित दर्शविलेली रक्कम रु. **50,49,467.00 + व्याज (रुपये पन्नास लाख एकोणपन्नास हजार चारशे सदुसष्ट रुपये फक + व्याज.)** सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांच्या आत भरपाई करण्याचा त्रुटेव्याने सुचने मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती.

संपूर्ण रक्कमेची भरपाई करण्याकरीता कार्जदार असमर्थ ठिसट ठरल्यामुळे आम जनतेला तसेच कार्जदार /जामीनदार यांना याद्वारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या 13 (4) सह वाचले जाणाऱ्या 2002 अँक्ट रुल 8 च्या अंतर्गत खालील दस्ताक्षरकर्त्याने खालील दिलेल्या संपत्तीचा **सांकेतिक ताबा दि. 18 नोव्हेंबर 2026** ला घेतला आहे.

विशेष करून कार्जदार /जामीनदार तसेच सर्वसामान्य जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये. सदर मालमत्तेबाबत करण्यात येणारे कोणतेही व्यवहार हे **दिनांक 01.09.2026 रोजी थकीत असलेल्या रु. 50,49,467.00 + व्याज (रुपये पन्नास लाख एकोणपन्नास हजार चारशे सदुसष्ट रुपये फक्त + व्याज.) + त्यावरील जमा होणारे व्याज** या रकमेकरिता **भारतीय स्टेट बँक, एपालनी - I, नागपूर** यांच्या बोजाच्या अधीन राहतील.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या बाबतीत सरफेसी अधिनियमाच्या कलम 13 मधील उप-कलम (8) मधील तरतुदीसाठी कार्जदाराची लक्ष आकर्षित केले जात आहे.

सुरक्षित मालमत्तेचे तपशील

मालमत्तेचा तपशील: - पहिली अनुसूची

मौजा जयताळा येथील खसरा क्रमांक 78, 166, 167 व 168 या संपूर्ण जमिनीचा भाग किंवा हिस्सा असलेली, प्लॉट क्रमांक 08 धारण करणारी, क्षेत्रफळ 4271.200 चौ. मीटर जमीन, पी.एस.के. 44, शहर सर्वे क्रमांक 489 व 648 तसेच लीट क्रमांक 37 (571) व 44 (572) असलेली, जयताळा, नागपूर येथे स्थित, नागपूर महानगरपालिका वॉर्ड क्रमांक 74 च्या हद्दीत, तहसील व जिल्हा नागपूर येथे स्थित असून तिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:

पूर्वेस - प्लॉट क्रमांक,
पश्चिमेस - खसरा क्रमांक 165 व 169
उत्तरेस - प्लॉट क्रमांक 2
दक्षिणेस - 12.00 मीटर रुंद रोड

दिनांक : 18/11/2026
स्थळ : नागपूर (डॉ.)

अधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक,
एपालनी - I, नागपूर

OMKARA ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
CIN: U67100TZ2014PTC020363
कॉर्पोरेट कार्यालय: कोहिनूर स्क्वेअर, सरोषशाहीवाला मजला, एन.सी.केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-400028.टेली.: 022-69231111

[जोडपत्र-IV- ए] [नियम ९(1) सह नियम ८(6) चे तरतूद पाहावी]

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुलस, 2002 मधील नियम ९(1) सह वाचण्यात येणारा नियम ८(6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणारा सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस ॲंड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि अशा जनतेस सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको ओमकारा अर्थव को-ऑपरेटिव्ह बँक लि. (''KUCBL'') यांचेकडे खालील वर्णनाच्या अचल मालमत्ता तारण / बोजाबाद असीत आणि त्यांची सांकेती अधिकिया आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुलस, 2002 अंतर्गत वाखाल करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचा चार्ज करीत दि. 24.05.2021 रोजी सांकेती अधिनियमावीत अनुच्छेद 13(2) अंतर्गत एक मागणी सूचना जारी केली ज्यात **कार्जदार/जामीनदार म्हणजे सर्वश्रुकुमार ओसो प्रोपरेसर्स, श्री संजीव व्यंकोनारायण रावडी, श्री भगवानदास नारायण रावडी यांना दि. 01.05.2021 रोजीपर्यंत एकूण थकबाकी रक्कम रु. 4,14,48,000/- (रुपये चार कोटी चौदा लाख अडुसष्ट हजार फक्त)** अधिक वरावरील दराने जमा झालेले व्याज/ वसूल न झालेले व्याज आणि अनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. या सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत परत करण्याचे आवाहन करण्यात आले होते. पुढे, ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (''ओआरसीएल'') (ओमकारा पीएस 25/2021-22 ट्रस्ट चे ट्रस्टी म्हणून) यांनी दि. 28.12.2021 रोजीच्या अधिकारांकित करारनाम्यानुसार कर्जदार / जामीनदार यांचेविरुद्ध असलेले संपूर्ण थकबाकी कर्जे/सर्वसंमत्ति ठेवसूचीसहित यांचेकडून अधिग्रहित केली आहेत. त्यानुसार, ओआरसीएल यांनी अधिग्रहणाकरकर्त्यांची जागा घेतलेली असून त्यांच थकबाकीची वसुली करण्याचा आणि अनाधीकार वसुलाई करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. ओआरसीएल यांचा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अनाधत सतांचा म्हणजे निम्नही सर्वांनाच्या दि. 13.06.2024 रोजी दुरुस्तीनंतर दि. 14.06.2024 रोजी प्रत्येक तार्खा भेलेलेली आहे.

त्यानुसार आता, ओआरसीएल चे प्राधिकृत अधिकारी थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद असलेल्या मालमत्तेची विक्री करून इच्छितात. मालमत्तेची विक्री सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(2) च (4) च्या तरतुदींनुसार वाखाल करण्यात आलेल्या हक्काच्या व अधिकारांच्या वाखाल करीत दि. 09/12/2026 रोजी स. 11.00 वाजता (भोली सदर करण्याच्या वेगवत्या दिनांक आहे 08/12/2026 रोजी सायं. 5.00 पा.) **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'', ''जेथे जे काही आहे'' आणि ''त्यास मही''** तत्त्वावर करण्यात येईल.अचल मालमत्ता, आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम पुढीलप्रमाणे आहे:

अचल मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम	वाढीची पट्टी रक्कम
प्लॉट क्र. 1 औद्योगिक जमीन / भूखिटिजमी याच. ता. अकोट, जि. अकोला येथील मिलर-शेती मालमत्ता, गट क्र. 162, त्यापैकी सुमारे 18.41 आर मापाने 14100 चौ.मी., ही जमीन औद्योगिक जमीनपासून वेगळीकरे करण्यात आलेली आहे. चतुर्सीमा: पूर्वेस - श्री उमेश गणेशकार यांची जमीन, पश्चिमेस - राया पांदन आणि एमीएल वानखेडे यांची जमीन, उत्तरेस - गट क्र. 162 मधील उर्वरित जमीन, दक्षिणेस - अकोट-शेगाव रोड.	2,00,00,000/-	20,00,000/-	5,00,000/-
प्लॉट क्र. 2-त्यावरचर बांधे त्यिवाय त्यियी मालमत्ता, मालकिचा क्र. 203, दुसरा मजला, मौजे जयरी ता. अकोट, जि. अकोला, सर्वे क्र. 35/2, नझुल प्लॉट क्र. 3/6, नझुल शीट क्र. 61, त्यापैकी तोजाट प्लॉट क्र 5 आणि पूर्व-पश्चिम क्षेत्रफळ 23.77 मी., उत्तर-दक्षिणेस 20.12 मी. एकूण क्षेत्रफळ सुमारे 478.26 चौ.मी. चतुर्सीमा: पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - प्लॉट क्र. 4, दक्षिणेस- रस्ता. सदर प्लॉट वर एक इमारत बांधलेली असून त्यात मेसर्स, तळ मजला, पहिला मजला आणि दुसरा मजला आहे. सदर इमारतीचे पहिल्या मजल्यापर्यंत बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच इमारतीचे दुसऱ्या मजल्यापर्यंत बांधकाम उत्तर-दक्षिण दिशेत असून, पश्चिम बाजूस असलेले अर्धवट भाग आणि पूर्व भिंत वगळता इतर बांधकाम पूर्ण झालेले आहे. अपूर्ण भागाचे पूर्व-पश्चिमेस विभाजन करत, दुसऱ्या मजल्यापर्यंत पश्चिम बाजूस असलेला भाग, क्षेत्रफळ उत्तर-दक्षिण 14 फूट 2 इंच, पूर्व-पश्चिमेस 41 फूट 6 इंच, एकूण क्षेत्रफळ सुमारे 587.64 चौ.फू. त्याचा चतुर्सीमा: पूर्वेस- मी. राजकुमार यादवी यांचा रिकामे प्लॉट, पश्चिमेस- मी. रामचरण यादवी यांचा रिकामे प्लॉट, उत्तरेस- मी. अविकलकुमार यादवी यांचा रिकामे प्लॉट, दक्षिणेस- रस्ता.	23,50,000/-	2,35,000/-	50,000/-

ई-लिलावाचे दिनांक	स्लॉट 1: 09/12/2026 रोजी स. 11.00 पा.; स्लॉट 2: 09/12/2026 रोजी दु. 12.00 पा.
सहभागासाठी केवसीपत्र/केवायसी दस्तावेज/ बयाना स्कमेचा पुरावा सादर करण्याची	08/12/2026 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत
इंगडत्या दिनांक व वेळ	
पाहणी दिनांक	04/12/2026 रोजी दु. 3.00 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत
जास्त बोलीचा तपशील	जास्त बोली

विक्रीच्या अटी व सर्तीच्या तपशीलवाराची कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे **http://omkararc.com/auction.php** मध्ये दिलेली लिंक पाहावी. बोलीदार वेबसाईटला **http://www.bankeauctions.com** येथे सुद्धा भेट देऊ शकतात.
ऑनलाईन बोलीकरणी करण्या संबंधी अधिक माहिती असेल आणि ऑनलाईन लॉगईन व पासवर्ड मिळवायचे असेल, ई-मेल प्रविनिधि प्रशिक्षण द्या. शी आणि त्यांचे ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. बीएसटीसी इंडिया प्रा.लि., देल्ही, हिम्मतसिंह, +91-7291981124/25/26, हिम्मत ई-मेल आयडी: **support@bankeauctions.com**, श्री पवनिथ पंडुजा, मोबाईल: 8866682937 ई-मेल: **maharashtra@c1india.com** येथे संपर्क साधावा आणि मालमत्तेशी संबंधित चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी श्री सतीश नायडू, मोबाईल: +91 8879545079,मेल: satish.naidu@omkararc.com पांचेशी संपर्क साधावा. बोली सादर करणेचेळी बोलीदारांनी नमूदचे व दिवालाळखोरी संहिता, 2016 चे पालन करणे आणि त्यातील अनुच्छेद 29अ अंतर्गत प्रापत्रता ठरते.

दिनांक: 21.11.2026
**स्थान: